# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

---

जा.क्र.मनपा/आस्था/ 713 /2021-22 दि. 28 /06 /2021

## ॥ कार्यालयीन आदेश ॥

**विषय:- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कोरोना विषाणूचा (कोविड-19) संसर्गजन्य प्रसार रोखण्यासाठी उपाययोजनांबाबत.**
**विशेष पथक यांची नेमणूक करुन सार्वजनिक ठिकाणी दंडात्मक कारवाई करणेबाबत.**

**संदर्भ:-** 1) **साथरोग प्रतिबंधक अधिनियम** 1897.
2) **महाराष्ट्र शासन अधिसुचना सार्व.आरोग्य विभाग**/58 **दि.**13 **मार्च** 2020.
3) **महाराष्ट्र कोविड-**19 **उपाययोजना नियम** 2020 **अन्वये महाराष्ट्र शासन अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, क्र.कोरोना** 2020/**प्र.क्र.**58/**आरोग्य** 5, **दि.**14/03/2020.
4) **जा.क्र.मनपा/अआ**/17/2020-21 **दि.**05/07/2020 **रोजीचा आदेश.**
5) **जा.क्र.मनपा/वैद्यकीय**/3433/2020-21 **दि.**15/03/2021 **रोजीचा आदेश.**
6) **जा.क्र.मनपा/वैद्यकीय/** /2020-21 **दि.**25/03/2021 **रोजीचा आदेश.**
7) **महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशिल (उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक, हाताळणी साठवणूक) अधिसूचना** 2018
8) **महाराष्ट्र विघटनशिल व अविघटनशिल कचरा (नियंत्रण) कायदा** 2006.
9) **जा.क्र.मनपा/आरोग्य**/21/2018-19 **दि.**09/04/2018 **रोजीचा आदेश.**
10) **जा.क्र.मिभा/मनपा/आस्था/4427/2020-21, दि.26/03/2021रोजीचा कार्यालयीन आदेश.**
11) **DMU/2020/CR.92/DisM-1, Date-21 April 2021 रोजीचा आदेश.**
12) **जा.क्र.मनपा/आस्था/183/2021-22, दि.23/04/2021 रोजीचा कार्यालयीन आदेश.**

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोविड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 ची अंमलबजावणी दि.13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भिय सुचना क्र.3 अन्वये कोरोना विषाणुमुळे (कोविड-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी नियमावली तयार केलेली आहे.आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र.3 च्या अधिसुचनेनुसार कोविड-19 चा प्रादुर्भाव प्रतिबंध करण्यासाठी सार्व.आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे अधिसुचनेद्वारे संबंधित महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.आणि,

ज्याअर्थी, कोविड-19 च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यात व देशांतर्गत कोविड-19 विषाणूच्या संसर्गामुळे बाधित झालेल्या व्यक्तीची संख्या मोठया प्रमाणात वाढत असल्याने खबरदारी घेण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक त्या उपाययोजना करणे अनिवार्य झाले आहे. तसेच, मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोविड-19 विषाणूचा संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ

होऊ न देता उपाययोजना राबविणे आवश्यक असुन कोरोना बाधित रुग्णांची व कोरोना संशयित व्यक्तींची संख्या वाढून आपत्तीजन्य परिस्थिती उद्भवू नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.आणि,

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील कोविड-19 च्या प्रादुर्भावाचा प्रतिबंध करण्यासाठी तसेच महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशिल (उत्पादन, वापर, विक्री, वाहतुक, हाताळणी, साठवणूक) अधिसूचना 2018 ची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, त्यानुसार संदर्भ क्र.10 तसेच संदर्भ क.12 च्या आदेशान्वये एकुण 57 पथके तयार करण्यात आलेली आहेत. सदर पथकांवर नियंत्रण ठेवणेसाठी खालीलप्रमाणे अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती कार्यालय | मुख्य नियंत्रण अधिकारी | पथक प्रमुख/नियंत्रण अधिकारी | सहाय्यक अधिकारी |
|---|---|---|---|---|
| 1. | प्रभाग समिती क्र.01 | श्री. अजित मुठे, उप-आयुक्त (अतिक्रमण) | श्री. हंसराज मेश्राम, प्र.प्रभाग अधिकारी | श्री. दिलीप जगदाळे, सहा.आयुक्त |
| 2. | प्रभाग समिती क्र.02 | | कु.प्रियांका भोसले, सहा.आयुक्त | श्री. जितेंद्र कांबळे, वरिष्ठ लिपीक |
| 3. | प्रभाग समिती क्र.03 | डॉ. संभाजी पानपट्टे, उप-आयुक्त (आरोग्य) | श्री. दामोदर संखे, प्र.प्रभाग अधिकारी | श्री. संजय दोंदे, सहा.आयुक्त |
| 4. | प्रभाग समिती क्र.04 | श्री. संजय शिंदे, उप-आयुक्त (वैद्यकीय) | श्रीम. कांचन गायकवाड, सहा.आयुक्त | श्री. राजकुमार घरत, प्र.सिस्टीम मॅनेजर |
| 5. | प्रभाग समिती क्र.05 | श्री. मारुती गायकवाड, उप-आयुक्त (मुख्यालय) | श्री. चंद्रकांत बोरसे, सहा.आयुक्त | श्री. अविनाश जाधव, सहा.आयुक्त |
| 6. | प्रभाग समिती क्र.06 | श्री. विजयकुमार म्हसाळ अतिरिक्त आयुक्त | श्री. स्वप्निल सावंत, सहा.आयुक्त | श्री. जगदिश भोपतराव, सहा.आयुक्त |

सर्व पथक प्रमुख/नियंत्रण अधिकारी/सहाय्यक अधिकारी यांनी त्यांना नेमुन दिलेल्या प्रभागामध्ये करण्यात येणाऱ्या दैनंदिन कार्यवाहीचा अहवाल मुख्य नियंत्रण अधिकारी यांचेकडे सादर करावा व मुख्य नियंत्रण अधिकारी यांनी वेळोवेळी मला अवगत करावे.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम, 1897 व शासन अधिसूचना क्र.कोरोना2020/प्र.क्र.58/आरोग्य 5, दि.14/03/2020 मधील नियम 11 नुसार, भारतीय दंडसंहिता (45 of 1860) च्या कलम 188 नुसार दंडनीय/कायदेशीर कारवाई करण्यात येईल, यांची स्पष्ट नोंद घ्यावी.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

1) **सहा.आयुक्त, प्रभाग समिती कार्यालय क्र.1, 2, 3, 4, 5 व 6**
2) **संबंधित अधिकारी/ कर्मचारी**
3) **खातेप्रमुख/ विभागप्रमुख (सर्व)**